अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५ । वर्ष : २३ वे अंक : १२९ वा किंमत : ५ रुपये पाने ८



भगवे कपडे, हातात आणि गळ्यात रुद्राक्षाची माळ, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे संगम घाटावर पवित्र स्नान करून आरतीही केले.




# येडशी अभयारण्यातून 'सुसाट' निघालेला वाघोबा बानसळे, आगळगाव परिसरात झाला 'सैराट'

## दोन बैलांच्या नरडीचा घेतला घोट

### वाघाच्या शोधार्थ, मोहीम सुरुच







बनसाळे : येथील भगिरथ शिंदे यांच्या बैलांवर केलेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या बैलांची पाहणी करताना रेस्क्यू टीमसह वन विभागाचे अधिकारी-कर्मचारी.

सोलापूर/प्रतिनिधी

सगळी यंत्रणा सज्ज ठेऊन जेरबंद करण्यासाठी येडशी अभायरण्यात असलेल्या रेस्क्यू टीमसह वन विभागाच्या पथकांना गुंगारा देत वाघोबा येडशी अभारण्यापासून साधारण ४० कि.मी.अंतरावर सुसाट गेला. बार्शी तालुक्याच्या उत्तर दिशेला असलेल्या आगळगाव परिसरात अधिवास ठेवलेल्या वाघाने बानसळे शिवारातील दोन बैलांच्या नरड्यांचा घोट घेत त्यांना यमसदनी पाठवले. हल्ला करुन दोन बैलांचा जीव घेतल्याची घटना बुधवार (ता.५) सकाळी उघडकीस आली. तद्नंतर रेस्क्यू टिमसह वन विभागाचे पथक वाघाच्या शोधार्थ, या परिसरात दाखल झाले.

दरम्यान वाघाला जेरबंद करण्यात अद्याप रेस्क्यू टिमला यश येत नसून वाघ पुढे आणि पथक मागे असाच 'सिलसिला' मागच्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. धाराशिव जिल्ह्यातून परत आलेला वाघोबा मागच्या काही दिवसांपासून येडशी अभारण्यात वास्तव्यास होता. त्याला ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरुच होते.

तथापि, याच टप्प्यावर वाघ येडशी अभारण्य सोडून बार्शी तालुक्यातील आगळगाव परिसरात गेला आहे. या ठिकाणी त्याच्या पाऊलखुणा बुधवारी निर्दशनास आल्या तर बानसळे गावच्या शिवारात भगिरथ शंकर कदम या शेतकऱ्याच्या दोन बैलांवर हल्ला केल्याची घटना उघडकिस आली. कदम यांनी मंगळवार (ता.४) आपल्या शेतात बैले बांधली होती. रात्री साधारण आठ वाजेपर्यंत बैल जोडी बांधलेल्या वस्तींवर होते. त्यानंतर ते मुक्कामासाठी घरी आले. सकाळी आठ वाजता ते परत वस्तींवर गेले असता त्यांना दोन्ही बैल मृत्यूमुखी पडल्याचे दिसले.

मंगळवारी रात्री आठनंतर वाघाने बैलांवर हल्ला केल्याचा तर्क घटनेवरुन बांधण्यात आला. बैलांवर हल्ला केल्याचे वन विभागास कळविल्यानंतर अप्पर उपवनसंरक्षक अजित शिंदे यांच्यासह वन विभागाचे अधिकारी तसेच रेक्स्यू टीम यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### आता बानसळे, आगळगाव परिसरात मोहीम

बानसळे येथे बैलांवर केलेला हल्ला आणि आगळगाव परिसरात आढळलेल्या पाऊलखुणा या पार्श्वभूमीवर, वाघाला ताब्यात घेण्यासाठी या ठिकाणी आता रेस्क्यू टीमस वन विभागाने मोहीम सुरु केली आहे.

# लहानपणीच चोर बनला, बक्कळ पैसा मिळवला प्रेयसीला ३ कोटींचा टोलेजंग बंगलाही दिला

## सोलापूरचा हा पठ्ठ्या अखेर तुरूंगात जावून बसला



सोलापूर/विशेष प्रतिनिधी

गुन्हेगारांचे हात किती लांब असतात,याचा थांगपत्ता लोकांना सोडाच पोलिसांनाही लागत नाही. अशाच एका अट्टल गुन्हेगाराचा कारनामा उजेडात आला आहे. लहानपणीच चोर बनला.तरूणपण आल्यानंतर दरोडे टाकायला सुरूवात केली.बक्कळ पैसा आला.तरूण वयात प्रेमाचे व्यसन लागले.त्याच्याकडील पैसा पाहून अनेक तरूणी त्याला भाळल्या. इतकेच काय एक अभिनेत्री देखील त्याच्या जाळ्यात सापडली होती. तिच्यासाठी ३ कोटींचा हस्तीदंताचा बंगला बांधून दिला. दरोडे टाकण्याचा त्यांचा धंदा सुरूच राहिला.अखेर तो खाकीवर्दीच्या ताब्यात सापडला.बंगळुरू पोलिसांनी त्याला अटक केली. विशेष म्हणजे हा पठ्ठ्या सोलापूरचा असून पंचाक्षरी एस स्वामी असे त्याचे नाव आहे

त्याचे असे झाले की, गेल्या दोन दशकांपासून देशभरात असंख्य चोऱ्या करणाऱ्या महाराष्ट्रातील एका ३७ वर्षीय कुख्यात चोराला बंगळुरू पोलिसांनी काल (मंगळवारी) अटक केली आहे. बंगळुरूचे पोलीस आयुक्त बी. दयानंद यांनी याबाबत माहिती दिली आहे. अटक केलेल्या आरोपींचे नाव पंचक्षरी एस. स्वामी असे आहे, तो महाराष्ट्रातील सोलापूर येथील रहिवासी आहे. ९ जानेवारी रोजी कर्नाटकची राजधानी बेंगळुरूमधील मारुती नगर येथील एका घरात १४ लाख रुपयांच्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या चोरी झाली होती. त्या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे. २०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज गोळा केल्यानंतर पोलिसांनी स्वामीला अटक केली आणि त्याच्याकडून १८१ ग्रॅम सोन्याचे बिस्किट, ३३ ग्रॅम चांदीचे दागिने आणि एक बंदुक जप्त केली.

### मागणी आल्यास विचार करू

स्वामी हा खुद्द सोलापूरचा आहे की, शहराबाहेरचा आहे याविषयी माहिती बंगळुरूच्या पोलिसांनी दिलेली नाही. त्याच्या गुन्ह्यांविषयी सोलापूर वा अन्य ठिकाणांहून मागणी आल्यास त्याला सोलापूरला पाठवण्याचा विचार केला जाईल अन्यथा नाही.तो आमच्या ताब्यात असून त्याची रवानगी तुरूंगात केली आहे, असे बंगळुरूचे पोलीस आयुक्त बी.दयानंद यांनी बुधवारी दै.सुराज्यशी बोलताना सांगितले.

#### अल्पवयीन असतानाच सुरू केल्या घरफोड्या

बंगळुरूमधील एका पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, स्वामींने २००३ मध्ये, अल्पवयीन असतानाच घरफोड्या करण्यास सुरुवात केली होती. २००९ पर्यंत तो एक अट्टल चोर बनला होता आणि यातून त्याने कोट्यवधींची संपत्ती जमवली होती. २०१४-१५ मध्ये, त्याचे एका अभिनेत्रीशी प्रेमसंबंध निर्माण झाले. त्याने तिच्यावर खूप खर्च केला, तिच्यासाठी कोलकातामध्ये ३ कोटी रुपयांचे घर बांधले तसेच तिला २२ लाख रुपयांचे मत्स्यालयही भेट दिले होते.

#### यापूर्वी गुजरात, महाराष्ट्रात कारवाई

२०१६ मध्ये, गुजरात पोलिसांनी स्वामींला एका चोरींच्या प्रकरणात अटक केली होती, त्यामध्ये त्याला अहमदाबादच्या साबरमती मध्यवर्ती कारागृहात सहा वर्षांची शिक्षा झाली. सुटका झाल्यानंतर, त्याने पुन्हा घरफोड्या सुरू केल्या, तेव्हा महाराष्ट्र पोलिसांनी त्याला पुन्हा अटक केली. २०२४ मध्ये सुटका झाल्यानंतर, तो बंगळुरूला गेला, जिथे त्याने त्याच्या गुन्हेगारी कारवाया सुरू ठेवल्या. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बेळगावमध्येही त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

#### अभिनेत्रींसह अनेक महिलांशी संबंध

तपासात सहभागी असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, ''आरोपी स्वामींचे अनेक महिलांसह अभिनेत्रींशीही संबंध आहेत. त्याने महिलांवर खूप पैसे खर्च केले आहेत. त्याला पत्नी आणि एक मूल असूनही त्याने कोलकाता येथील त्याच्या प्रेयसीला ३ कोटी रुपयांचे घर बांधून दिले आहे. अनेकदा तो एकटाच चोऱ्या करतो, रिकामी घरे पाहतो आणि त्यांना लक्ष्य करतो.''



## कुरनूर धरणातून खाली पाणी सोडले

### तीन दरवाज्यांद्वारे १२०० क्युसेक पाण्याचा विसर्ग

अक्कलकोट : रब्बी हंगामासाठी अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर धरणातून बुधवारी दुपारी चार वाजता खाली पाणी सोडण्यात आले आहे. कुरनूर धरणाच्या तीन दरवाज्यांद्वारे १२०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे गुरुवारी आठही कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे तुडुंब भरणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यातून समाधान व्यक्त होत आहे. एकंदरीत जवळपास १५ ते२० टक्के पाणी सोडण्यात येणार आहे. यामुळे अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी शहराचादेखील पाणीप्रश्न मिटणार आहे. कुरनूर धरणात सध्या ८० टक्के पाणीसाठा आहे. त्यामधून २० टक्के पाणी खाली सोडण्यात आले आहे. त्यानंतर कुरनूर धरणात ६० टक्के पाणीसाठा शिल्लक राहणार आहे. सांगवी, अक्कलकोट, निमगाव आणि मिरजगी, सातनदुधनी, संगोगी, रुद्देवाडी आदी बंधारे भरुन घेण्यात येत असल्याचे माहिती उपअभियंता प्रकाश बाबा यांनी दिली.

## पळालेल्या बिबट्यांमुळे माळशिरस तालुक्यात भीतीचे वातावरण



वेळापूर : श्रीपूर - माळशिरस तालुक्यातील वेळापूर नजिक दसूरपाटी जवळच्या महामार्गावरून दोन बिबटे मंगळवारी रात्री पळून गेल्यानंतर बुधवारी दिवसभर या तालुक्यातील अनेक गावांमध्ये तसेच वाड्या वस्त्यांवर भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान मंगळवारी रात्री मरण पावलेल्या एका बिबट्याचे शवविच्छेदन बुधवारी करण्यात आले.त्यानंतर माळशिरसमध्ये वनखात्याच्या वतीने त्याचे दफन करण्यात आले.त्या बिबट्याचा मृत्यू पिकअपच्या धडकेने झाला की अन्य कारणांमुळे झाला हे आता शवविच्छेदनाच्या अहवालातूनच स्पष होणार आहे.

मंगळवारी रात्री ७:३० च्या सुमारास माळशिरस तालुक्यातील वेळापूर जवळील दसूरपाटी नजीक संत ज्ञानेश्वर महाराज पालखी जवळ मार्गावरून ३ बिबटे रस्ता पार करत असताना नर बिबट्याला पिकअपने धडक दिली होती तर दोन बिबटे अंधारातून केसकरवाडीकडे पळून गेले होते. पिकअपने कशाला धडक दिली हे पाहण्यासाठी पालखी मार्ग उतरुन खाली गेलेले चंद्रसेन रणवरे व समाधान खपाले या तरुणांवर बिबट्याने जखमी अवस्थेतही अचानकपणे हल्ला केल्याने ते जखमी झाले होते. त्यांना तातडीने बोंडले येथील डॉ जयंत चव्हाण यांच्या सुश्रुत हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते. पिकपच्या धडकेने मरण पावलेल्या नर बिबट्याचे शवविच्छेदन पशुवैद्यकीय विकास अधिकारी विस्ताराधिकारी डॉ. प्रवीण शिंदे, डॉ. नवनाथ ठवरे, डॉ. शहाजी ठवरे, डॉ. सर्जेराव वाघमोडे, डॉ. उमेश वरकुटे, डॉ. शशिकांत राऊत, डॉ. योगेश गायकवाड, डॉ. औदुंबर गावडे यांनी येथे केले.

माळशिरस तालुक्यात गेली दोन वर्षांमध्ये कोळेगाव, फळवणी, निमगाव, कुसमोड, धानोरे, मळोली या गावाच्या परिसरामध्ये बिबट्या सदृश्य पाण्याचा वावर आढळून आलेले आलेला होता. त्याबाबत वनविभागाने पहाणी केलेल्या ठशावरुन वरील भागात बिबट्या असल्याचे वन विभागाने त्यावेळी दुजोरा दिलेला होता. यातच दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दसूर जवळे दोन बिबटे अंधारातून पळून गेले. वन विभाग माळशिरस अधिकारी यांनी बिबट्याबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी सोलापूरचा म्हणजे सोलापूरकर आहे, यावर तो उगाच भडकला!

कल्याण
280-04-239

मुंबई
270-96-790

# निवृत्त प्राध्यापकाच्या मृत्यूचे गूढ वाढले, एका महिलेने परस्पर ३ लाख रू.लाटले

### मुलाच्या तक्रारीनंतर ४० दिवसांनी प्रेत उकरून पोस्टमार्टम केले. त्या महिलेविरूद्ध गुन्हा दाखल

सोलापूर/प्रतिनिधी

सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या दफनविधीनंतर मुलाच्या मनात वडिलाच्या मृत्यूसंबंधी संशयाचे काहूर माजले. त्यानंतर त्याने पोलिसांकडे तक्रार अर्ज दाखल केला.त्या अर्जाच्या चौकशीसाठी चक्क कब्रस्तानमधून प्रेत उकरून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर दंडाधिकाऱ्यांच्या साक्षीने त्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार सोलापुरात घडला.



म. यासीन सय्यद असे मृताचे नांव असून मुलाच्या तक्रारी अर्जावरून श्रध्दा मलखारे हिच्याविरूध्द विजापूर नाका पोलीस ठाण्यात ३ फेब्रुवारीला विजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सोलापुरातील अल्पसंख्याक समाजाच्या एका नामवंत शाळेत प्राध्यापक म्हणून सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त झालेले म. यासीन म. रजाक सय्यद यांना गीत संगीताचे वेड होते. त्यांचा मुलगा आणि मुलगी शिक्षणाच्या निमित्ताने मुंबईत वास्तव्यास होती, ते आजही आईसह तेथेच वास्तव्य करीत आहेत. मुंबईतील वर्दळीचे जगणे त्यांना अस्वस्थ करीत असल्याने २०१४ मध्ये ते सोलापूरमध्ये होटगी रस्त्यावरील लोखंडवाला कॉम्प्लेक्समध्ये एकटेच वास्तव्यास होते. त्यानंतर त्यांनी ती जागा सोडून सिध्देश्वर पेठेतील राम सदन अपार्टमेंटमध्ये वास्तव्यास गेले. त्यानंतर जुळे सोलापुरातील लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये त्यांची मैत्रीण श्रध्दा मलखारे तिच्याकडे राहण्यास जात असल्याचे त्यांनी आपल्या मुलास कळविले होते. त्यांना एकमेकांचा आधार होईल, या भावनेतून मुलगा तनवीर याने त्यावर कोणताही आक्षेप घेतला नव्हता. पेन्शनर प्रा. म. यासीन अ.रजाक सय्यद १९ मार्च २०२४ रोजी मैत्रीण श्रद्धा मलखारे हिच्या घरी राहण्यासाठी गेले. त्यांचे २९ एप्रिल रोजी निधन झाले. त्याच दिवशी नातेवाईकांच्या हजेरीत दफनविधीही झाला. २५ एप्रिल रोजी झालेल्या संभाषणात वडिलांची प्रकृती ठणठणीत असताना अवघ्या चार दिवसात झालेला मृत्यू मुलाच्या मनात संशय निर्माण करून गेला. मुलगा तन्वीर सय्यद याने १८ मे २०२४ रोजी वडिलांच्या मृत्यूबाबत आणि त्यांच्या खात्यावरील गैरव्यवहाराबाबत कायदेशीर चौकशी होऊन तातडीने गुन्हा दाखल व्हावा आणि मला व माझ्या कुटुंबियांना न्याय देण्याबाबत या विषयाचा श्रध्दा मलखारे (रा.१०१ लक्ष्मी हाईटस जगदंबा नगर, जुळे सोलापूर) हिच्याविरुध्द अर्ज दाखल केला. त्या तक्रारींवरून श्रध्दा मलखारे हिच्याविरूध्द मृताच्या खात्यावरील गैरव्यवहार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणाची चौकशी सुरू असून शवविच्छेदनाच्या अहवालाची प्रतिक्षा आहे. त्यानंतर पुढील तपास हाती घेतला जाईल.

**– संगीता पाटील, पोलीस निरीक्षक, विजापूर नाका पोलीस ठाणे**

### तीन दिवसात तीन लाख ट्रान्सफर

२९ एप्रिल रोजी सय्यद यांची प्रकृती खालावण्याचा निरोप श्रद्धाने दिल्यावर पहाटे तेथे गेलेल्या नातेवाईकांना त्यांचे निधन झाल्याचे बोलावलेल्या रुग्णवाहिका चालकाने सांगितले. त्यांचा अंत्यविधी झाला. दरम्यान त्यांची जीआरत होण्यापूर्वी १ ते ३ मे २०२४ या तीन दिवसामध्ये त्यांच्या फोन पे अकाउंट वरून तीन लाख रुपये श्रद्धाने तिच्या खात्यावर ट्रान्सफर करून घेतले, अशी मुलगा तनवीर याची तक्रार आहे. त्याच्याच तक्रारी अर्जावरून पुरलेला मृतदेह ही उकरून पोलीस आणि तहसीलदाराच्या समक्ष शवविच्छेदन करण्यात आले.